**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रेसनोट**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात अनधिकृत फेरीवाले, अतिक्रमण आणि वाहतूक व्यवस्थापनासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरी सुविधांचे नियोजन, रस्त्यांवरील अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले आणि वाहतूक व्यवस्थापनाशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी दिनांक १८ मार्च २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

बैठकीत अनधिकृत फेरीवाले, सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण, अनधिकृत पार्किंग आणि पडीक वाहने यामुळे नागरी सुविधांवर होणारा परिणाम, वाहतूक कोंडी आणि शहरातील स्वच्छता यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, या बैठकीत नागरी सुविधांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि नागरीकांना अधिक चांगल्या सेवा प्रदान करण्यासाठी उपाययोजनांवर विचारविनिमय करण्यात आला.

शहरातील मुख्य रस्ते, चौक आणि बाजारपेठांमध्ये अनधिकृत फेरीवाल्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी आणि स्वच्छतेच्या समस्या सोडवण्यासाठी त्वरित कारवाईचे निर्देश देण्यात आले. सार्वजनिक जागांवरील अनधिकृत बांधकामे, फूटपाथ आणि सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण तातडीने हटविण्यासाठी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सार्वजनिक ठिकाणी दीर्घकाळापासून उभी असलेली पडीक वाहने ओळखून ती तातडीने हटविण्याचे आदेश देण्यात आले. मा. आयुक्त यांनी नागरी सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी महापालिका प्रभाग अधिकारी आणि कर्मचारी यांनी पोलिस यंत्रणाशी समन्वय साधून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, पोलिस उपायुक्त (परिमंडळ १) प्रकाश गायकवाड, शहर अभियंता दिपक खांबित, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण, प्रभाग समिती क्रमांक १ ते ६ चे सहाय्यक आयुक्त, पोलीस निरीक्षक, फेरीवाला पथक प्रमुख, वाहतूक पोलिस निरीक्षक व अतिक्रमण विभाग कर्मचारी उपस्थित होते.